महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा [ लिपिक व सहाय्यक ] सेवाप्रवेशोत्तर ... परीक्षा.

नियम ५ [अ] अनुसार वेतनवाढ रोखण्यात आलेली नसल्यास सदर वेतनवाढ पूर्वलक्षीप्रभावाने रोखण्याबाबत.

28

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक-परीक्षा-१०९१/[प्र.क्र. ४/९१]/१७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : 15 OCT 1991

प रि प त्र क

महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा [ निम्नस्तर लिपीक ] सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा नियम, १९७७ व महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा [ सहाय्यक ] सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा नियम १९७७ या दोन्ही नियमावलीतील नियम ५[अ] मध्ये परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास होणा-या परिणामासंबंधिच्या अन्य तरतूदींबरोबर खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

"तो परीक्षा उत्तीर्ण होई पर्यंन्त किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून नियम ६ च्या पोटनियम २ अन्वये त्यास सूट मिळे पर्यन्त निम्नस्तरीय लिपिकाच्या/सहाय्यकाच्या वेतनश्रेणीतील पुढील वेतनवाढ त्याला देण्यात येणार नाही."

२. नियम ५ [अ] मधील उक्त तरतूदींनुसार जे कर्मचारी वेतनवाढ रोखण्यास पात्र होते, परंतु काही कार्यालयीन अडचणींमुळे किंवा प्रशासकीय कारणामुळे त्यांची वेतनवाढ रोखण्याचे आदेश काढण्यास विलंब झाला असेल अथवा तसे आदेश काढण्याचे राहून गेले असेल आणि त्या कर्मचा-यास त्याची पुढील वेतनवाढ नियमीतपणे देण्यात आली असेल, अशा कर्मचा-यांची वेतनवाढ पूर्वलक्षी प्रभावाने रोखता येणे शक्य आहे काय, असा प्रश्न उपस्थित झाला होता. यासंबंधात काळजीपूर्वक विचार करुन शासनाने असा निर्णय घेतला आहे की, उक्त नियमामध्ये वेतनवाढ रोखण्याची विनिर्दिष्ट तरतूद असल्यामुळे वेतनवाढ रोखण्यास पात्र असलेल्या कर्मचा-यांची वार्षिक वेतनवाढ ज्या दिनांकापासून रोखणे आवश्यक होते त्या दिनांकापासून रोखण्यात यावी आणि त्या दिनांकापुढील त्याची वार्षिक वेतनवाढ त्याला देण्यात आली असेल तर ती वेतनवाढ त्याला अनुज्ञेय नसल्यामुळे, त्याला अतिप्रदान झालेली रक्कम त्याच्याकडून वसूल करण्यात यावी.

३. सर्व मंत्रालयीन विभाग, सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांना विनंती करण्यात येते की, वरील प्रकारच्या प्रकरणामध्ये वेतनवाढ रोखण्याचे आदेश काढण्याचे

[ क्र. पा. प. ]

२५



राहून गेले असल्यास वरील परिच्छेद २ मध्ये म्हटल्याप्रमाणे त्यांनी कार्यवाही करावी तसेच त्यांना अशीही विनंती करण्यात येते की, त्यांनी हे परिपत्रक परीक्षेला बसणा-या सर्व उमेदवारांच्या निदर्शनास आणावे.

४. हे आदेश विधी व न्याय विभागाच्या क्रमांक २८२७ बी, दिनांक ३० ऑगस्ट, १९९० व वित्त विभागाच्या क्रमांक ९५२/९१/सेवा ३ दिनांक २४ सप्टेंबर १९९१ या अनौपचारिक संदर्भान्वये त्या विभागाच्या सहमतीने काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[signature]

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१] सर्व मंत्रालयीन विभाग

२] अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई

३] निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई

४] सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई [पत्राने]

५] विधी व न्याय विभाग [बी]

६] वित्त विभाग सेवा-३,

७] निवड नस्ती.